शिक्षण मंडळ,कराड संचालित

# महिला महाविद्यालय,कराड

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

# आझादी का अमृत महोस्तव

## कार्यक्रम अहवाल

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३

- **कार्यक्रमाचे नाव** : आझादी का अमृत महोस्तव अंतर्गत "स्वराज्य महोस्तव" व "हर घर तिरंगा" उपक्रम
- **महाविद्यालयाचे नाव** : महिला महाविद्यालय,कराड
- **विभागाचे नाव** : राष्ट्रीय सेवा योजना विभाग व IQAC
- **प्राचार्यांचे नाव** : प्रो.(डॉ) इला जोगी
- **कार्यक्रम अधिकारी** : प्रा.अखिलेश शिंदे
- **कार्यक्रमाचा तपशील** :

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर देशात सर्वत्र "आझादी का अमृत महोस्तव" अंतर्गत विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते. या अंतर्गत "हर घर तिरंगा" व महाराष्ट्र शासन यांच्या वतीने "स्वराज्य महोस्तव" हे उपक्रम देखील विविध कार्यक्रम घेऊन मोठ्या उत्साहात साजरे करण्याचे आवाहन शासनाच्या वतीने देशातील सर्व घटकांना,नागरिकांना करण्यात आले होते. या संदर्भात शिक्षण मंडळ,कराड संचालित महिला महाविद्यालय,कराड मधील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व IQAC विभागाच्या वतीने "आझादी का अमृत महोस्तव" (स्वातंत्र्याचा अमृत महोस्तव) अंतर्गत "हर घर तिरंगा"(घर घर तिरंगा) व "स्वराज्य महोस्तव" असे विविध उपक्रम हे विविध कार्यक्रम आयोजित करून मोठ्या उत्साहात ते साजरे केले.या संपूर्ण कार्यक्रमाचा अहवाल पुढीलप्रमाणे ......

### आझादी का अमृत महोस्तव अंतर्गत "स्वराज्य महोस्तव" व "हर घर तिरंगा" निमित्त उपक्रम

| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | दिनांक |
|---|---|---|
| १ | "हर घर तिरंगा" - जनजागृती कार्यशाळा | ०५/०८/२०२२ |
| २ | क्रांती दिन- स्वराज्य महोस्तव – सामुहिक राष्ट्रगीत गायन | ०९/०८/२०२२ |

| | | |
|---|---|---|
| ३ | हर घर तिरंगा जनजागृती फेरी | १०/०८/२०२२ |
| ४ | महाविद्यालय व परिसर स्वच्छता | १२/०८/२०२२ |
| ५ | वक्तृत्व स्पर्धा | १२/०८/२०२२ |
| ६ | अंमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा | १२/०८/२०२२ |
| ७ | निबंध स्पर्धा | १३/०८/२०२२ |
| ८ | हर घर तिरंगा | १३/०८/२०२२ |
| ९ | हर घर तिरंगा | १४/०८/२०२२ |
| १० | भारतीय स्वातंत्र्य दिन | १५/०८/२०२२ |
| ११ | सांस्कृतिक कार्यक्रम | १५/०८/२०२२ |
| १२ | चित्रकला / पोस्टर स्पर्धा व प्रदर्शन | १५/०८/२०२२ |
| १३ | सामुहिक राष्ट्रगीत गायन | १७/०८/२०२२ |

## १. "हर घर तिरंगा" - जनजागृती कार्यशाळा :

**"आझादी का अमृत महोस्तव" व "स्वराज्य महोस्तव" या कार्यक्रमा अंतर्गत "हर घर तिरंगा" दि.१३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२२ हा उपक्रम मोठ्या प्रमाणात राबवण्याच्या उद्देशाने देशातील सर्व नागरिकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते.आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व IQAC यांच्या वतीने हा उपक्रम समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्याच्या व जनजागृती करण्याच्या उद्देशाने "हर घर तिरंगा" जनजागृती कार्यशाळा ही सर्व विद्यार्थिनी व स्टाफ यांच्यासाठी दि.०५ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी १०:०० वाजता आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रम अधिकारी प्रा.अखिलेश शिंदे यांनी "हर घर तिरंगा" हा उपक्रम राबवण्यामागची शासनाची भूमिका स्पष्ट करून ध्वजसंहिता, ध्वजारोहण करण्याचे नियम, घ्यावयाची खबरदारी या संबंधी उपस्थितांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रो.डॉ.इला जोगी यांनी सर्व विद्यार्थिनी,प्राध्यापक यांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले.तसेच या उपक्रमाची जनजागृती करण्यामध्ये विद्यार्थीनिनी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले.कार्यक्रमाचे आभार प्रा.विलास सुर्वे यांनी मानले वकार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.अंकिता थोरात यांनी केले.**









## २. स्वराज्य महोस्तव - क्रांती दिन – सामुहिक राष्ट्रगीत गायन :

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोस्तव हा संपर्ण देशभर “आझादी का अमृत महोस्तव” या # अंतर्गत मोठ्या प्रमाणावर विविध कार्यक्रम आयोजित करून साजरा करण्यात आला. या अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्यावतीने दि.०९ ऑगस्ट २०२२ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत “स्वराज्य महोस्तव” हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार क्रांती दिनानिमित्त दि.०९ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता एकाच वेळी सर्वत्र राष्ट्रगीताचे सामुहिक स्वरुपात गायन करण्यात आले. शिक्षण मंडळ,कराड संचालित महिला महाविद्यालय,कराड मधील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व IQAC विभागाच्या वतीने देखील या “सामुहिक राष्ट्रगीत गायन” या उपक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाचे आयोजन बाहेर मैदानावारती करण्यात आले होते. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनी,प्रभारी प्राचार्या, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर सेवक वर्ग यांच्या उपस्थितीत सामुहिक स्वरुपात राष्ट्रगीत गायन करण्यात आले.






### ३. “हर घर तिरंगा”- जनजागृती फेरी :

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाल्याने यानिमित्त “आझादी का अमृत महोस्तव” अंतर्गत “हर घर तिरंगा” हा उपक्रम दि.१३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत मोठ्या प्रमाणात राबवण्याच्या उद्देशाने देशातील सर्व नागरिकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व IQAC यांच्या वतीने हा उपक्रम समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्याच्या व जनजागृती करण्याच्या उद्देशाने “हर घर तिरंगा” जनजागृती फेरीचे आयोजन दि.१० ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ०९:३० वाजता करण्यात आले. नूतन मराठी शाळा, कन्या शाळा,मंगळवार पेठ, बुधवार पेठ,पांढरीचामारुती या भागातून ही फेरी काढून “हर घर तिरंगा” या उपक्रमात लोकांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले. महाविद्यालयातील सर्व स्टाफ व जवळपास ३०० विद्यार्थींनी यामध्ये सहभाग घेतला.






### ४. महाविद्यालय व परिसर स्वच्छता :

“आझादी का अमृत महोस्तव” अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या वतीने दि.०९ ऑगस्ट २०२२ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत “स्वराज्य महोस्तव” हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार दि. १२ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ९ :०० ते ११:०० या वेळेत महाविद्यालयाचा अंतर्गत परिसर व बाहेरील परिसर या ठिकाणांची श्रमदानातून

स्वच्छता करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना विभाग व IQAC विभागाच्या वतीने  या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.












## ५. वक्तृत्व स्पर्धा :

"आझादी का अमृत महोस्तव"  व "स्वराज्य महोस्तव" या उपक्रमांतर्गत आयोजित विविध उपक्रमामध्ये विद्यार्थीनीना सहभागी करून घेण्याच्या उद्देशाने व भारतीय स्वातंत्र्यपप्राप्तीसाठी ज्या असंख्य क्रांतीकारकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले,आपले सर्वस्व देशासाठी अर्पण केले.अशा शुरविरांचे स्मरण व्हावे या उद्देशाने महाविद्यालयात दि.१२ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ११: ०० वाजता राष्ट्रीय सेवा योजना विभाग व IQAC विभागाच्या वतीने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोस्तव, भारतीय स्वातंत्र्य लढा , आजच्या युवकांच्या मनातील भारत, स्वातंत्र्य संग्रामातील शिलेदार  या विषयांवर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण १० विद्यार्थीनिनी सहभाग घेतला. प्रा.विलास सुर्वे यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले.






## ६. अंमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा :

भारत सरकारच्या “आझादी का अमृत महोस्तव” या कार्यक्रमाचा भाग म्हणून नशामुक्त भारत अभियानांतर्गत दि. १२ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ८:०० वाजता “अंमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा” घेण्यात आली. अंमली पदार्थांचे सेवनाची गंभीरता त्याचे परिणाम याविषयी विद्यार्थिनिंना मार्गदर्शन करण्यात आले. प्रा.विलास सुर्वे यांनी अंमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा विद्यार्थीनीना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अखिलेश शिंदे यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनी,प्रभारी प्राचार्या, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर सेवक वर्ग यांची उपस्थिती होती.

## ७. निबंध स्पर्धा :

“आझादी का अमृत महोस्तव” व “स्वराज्य महोस्तव” या उपक्रमांतर्गत आयोजित विविध उपक्रमामध्ये विद्यार्थीनीना सहभागी करून घेण्याच्या उद्देशाने व भारतीय स्वातंत्र्यपप्राप्तीसाठी ज्या असंख्य क्रांतीकारकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले,आपले सर्वस्व देशासाठी अर्पण केले.अशा शुरविरांचे स्मरण व्हावे या उद्देशाने महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व IQAC विभागाच्या वतीने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोस्तव, भारतीय स्वातंत्र्य लढा , आजच्या युवकांच्या मनातील भारत, स्वातंत्र्य संग्रामातील शिलेदार या विषयांवर निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण २६ विद्यार्थीनिनी सहभाग घेतला.

## ८. हर घर तिरंगा :

"आझादी का अमृत महोस्तव" व "स्वराज्य महोस्तव" या कार्यक्रमा अंतर्गत "हर घर तिरंगा" दि.१३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२२ हा उपक्रम संपूर्ण देशभर मोठ्या प्रमाणात राबवण्यात आला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व IQAC यांच्या वतीने "हर घर तिरंगा" हा उपक्रम महाविद्यालयात देखील दि.१३ ऑगस्ट, दि.१४ ऑगस्ट व दि.१५ ऑगस्ट २०२२ रोजी राबविण्यात आला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रो.डॉ.इला जोगी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सर्व विद्यार्थिनी,सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर सेवक वर्ग यांची उपस्थिती या उपक्रमासाठी होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अखिलेश शिंदे यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रा.विलास सुर्वे यांनी मानले.

सर्व विद्यार्थिनी व स्टाफ यांना देखील "हर घर तिरंगा" या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार विद्यार्थिनी व स्टाफ यांनी देखील "हर घर तिरंगा" उपक्रमात उस्फुर्तपणे सहभाग घेऊन आपापल्या घरावरती तिरंगा फडकवला.









## ९. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोस्तव :

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर देशात सर्वत्र "भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोस्तव " हा दि.१५ ऑगस्ट २०२२ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.शिक्षण मंडळ,कराड संचालित महिला महाविद्यालय,कराड मधील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व IQAC विभागाच्या वतीने "आझादी का अमृत महोस्तव" (स्वातंत्र्याचा अमृत महोस्तव)

हा विविध कार्यक्रम आयोजित करून मोठ्या उत्साहात साजरा केला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रो.डॉ.इला जोगी या उपस्थित होत्या. प्रभारी प्राचार्या प्रो.डॉ.इला जोगी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. शिक्षण मंडळ,कराडचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.योगेश चिवटे व कृष्णाकाठ कार्यालयाच्या समन्वयक श्रीमती भालेराव मॅडम यांची उपस्थिती होती.प्रभारी प्राचार्या प्रो.डॉ.इला जोगी यांनी उपस्थितांना भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोस्तवाच्या शुभेच्छा देऊन आपले मनोगत व्यक्त केले. स्वातंत्र्य दिनानिमित्त महाविद्यालयातील परिसरात रांगोळी काढून व झाडांच्या कुंड्या ठेवून सुशोभीकरण करण्यात आले होते.प्रा.अखिलेश शिंदे यांनी या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.प्रा.विलास सुर्वे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सर्व विद्यार्थिनी,सर्व प्राध्यापक,पी.पी.जी.आय.टी.स्टाफ, शिक्षकेत्तर सेवक वर्ग या सर्वांची उपस्थिती यावेळी होती.









## १०. सांस्कृतिक कार्यक्रम :

"भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोस्तव " हा दि.१५ ऑगस्ट २०२२ रोजी संपूर्ण देशभर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.शिक्षण मंडळ,कराड संचालित महिला महाविद्यालय,कराड मधील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व IQAC विभागाच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृत महोस्तवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी देशभक्तीपर गीत, देशभक्तीपर समुहनृत्य, समूह गीत सादर करून विद्यार्थीनिनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. कु.प्रतिक्षा माने यांनी या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. साधारणपणे ५० ते ५५ विद्यार्थीनिनी या कार्यक्रमात उस्फुर्त सहभाग घेतला होता.









### ११. चित्रकला / पोस्टर  स्पर्धा व प्रदर्षन :

शिक्षण मंडळ,कराड संचालित महिला महाविद्यालय,कराड मधील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व IQAC विभागाच्या वतीने  “भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोस्तव ” निमित्त दि.१५ ऑगस्ट २०२२ रोजी चित्रकला / पोस्टर  स्पर्धा व प्रदर्षनाचे आयोजन केले होते. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोस्तव, हर घर तिरंगा,  स्वातंत्र्य संग्रामातील शिलेदार  या विषयांवर चित्रे व पोस्टर्स बनवण्यासाठी विद्यार्थीनींना आवाहन करण्यात आले होते.एकूण २८ विद्यार्थीनिनी यामध्ये सहभाग घेतला.विद्यार्थीनिनी तयार केलेल्या चित्रांचे व पोस्टर्सचे प्रदर्शन महाविद्यालयात भरविण्यात आले होते.

### १२. सामुहिक राष्ट्रगीत गायन :

भारतीय स्वातंत्र्याच्या  अमृत महोस्तव हा  संपर्ण देशभर  “आझादी का अमृत महोस्तव”  या # अंतर्गत मोठ्या प्रमाणावर विविध कार्यक्रम आयोजित करून साजरा करण्यात आला. या अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्यावतीने दि.०९ ऑगस्ट २०२२ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत  “स्वराज्य महोस्तव” हा  उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार “स्वराज्य महोस्तव” या उपक्रमाचा शेवट हा दि.१७  ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता एकाच वेळी सर्वत्र राष्ट्रगीताचे  सामुहिक स्वरुपात गायन करून करण्यात आला.  शिक्षण मंडळ,कराड संचालित महिला महाविद्यालय,कराड मधील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व IQAC विभागाच्या वतीने  देखील या “सामुहिक राष्ट्रगीत गायन” या उपक्रमाचे आयोजन केले.

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनी,प्रभारी प्राचार्या, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर सेवक वर्ग यांच्या उपस्थितीत सामुहिक स्वरुपात राष्ट्रगीत गायन करण्यात आले.

वरील प्रमाणे शिक्षण मंडळ,कराड संचालित महिला महाविद्यालय,कराड मधील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व IQAC विभागाच्या वतीने "आझादी का अमृत महोस्तव" (स्वातंत्र्याचा अमृत महोस्तव) अंतर्गत "हर घर तिरंगा"(घर घर तिरंगा) व "स्वराज्य महोस्तव" असे विविध उपक्रम हे विविध कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करून मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले.

समन्वयक
प्रा. श्री. अखिलेश शिंदे

प्र. प्राचार्य
प्रो.(डॉ.) इला जोगी

IQAC Co-ordinator
Mahila Mahavidyalaya, Karad

I/c. Principal
Mahila Mahavidyalaya, Karad